क्रमांक : ६८४९ /म.वि.स./ब
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई.
दिनांक : २१ जून, २०२४

# :: परिपत्रक ::

निदेशानुसार मंत्रालयीन सर्व विभागांना कळविण्यात येते की, ४०-दर्यापूर (अ.जा.) मतदारसंघातून महाराष्ट्र विधानसभेवर निवडून आलेले सदस्य श्री. बळवंत बसवंत वानखडे, यांनी महाराष्ट्र विधानसभेतील त्यांच्या जागेचा दिलेला राजीनामा मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी बुधवार, दिनांक १२ जून, २०२४ रोजी मध्यान्होत्तर स्वीकारला असल्याने भारतीय संविधानातील अनुच्छेद १९०(३)(ख) अन्वये विधानसभेतील त्यांची जागा बुधवार, दिनांक १२ जून, २०२४ पासून रिक्त झाल्याने त्यांच्या अतारांकित प्रश्नांबाबत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी :-

१. सदस्यांनी फक्त त्यांच्या स्वत:च्या नावाने दिलेले प्रश्न व्यपगत समजण्यात यावेत.
२. इतर सदस्यांच्या प्रश्न सूचनेबरोबर नाव जोडण्यात आले असेल तर सदर प्रश्नामधून त्यांचे नाव वगळण्यात यावे.
३. जर प्रश्न सूचनेवर उक्त सदस्यांचे प्रथम क्रमांकावर नाव असेल व त्यापुढे अन्य सदस्यांची नावे असतील तर त्यांचे नाव वगळून तो प्रश्न त्यापुढील सदस्यांच्या नावे दर्शविण्यात यावा.

(सीमा तांबे)
अवर सचिव
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

प्रति:

१. सर्व मंत्रालयीन विभाग, मुंबई-४०० ०३२
२. मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
३. सर्व मा. मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव